| | पोलीस आयुक्तालय नवी मुंबई<br>प्रेसनोट | 2026<br>CB/ 07/2026 |
|---|---|---|
| गुन्हे शाखा, नवी मुंबई | | दिनांक ०४.०२.२०२६ |

**मोटारसायकल चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखेने अटक करून १४ गुन्हे उघड केले.**

-----------------------------------------------------------------------------------------

श्री.मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे,पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेशित केले आहे.

मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आलेली होती. त्यांनी घटनास्थळाचे परिसरातील सीसीटिव्ही फुटेजेसची पाहणी करून तांत्रिक माहिती उपलब्ध केली. तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून गुन्हयातील रेकॉर्डवरील आरोपी हा वाशी परिसरात चोरीचे वाहन घेवुन येणार असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने तेथे पोलीस पथकासह सापळा रचुन शिताफीने आरोपीस ताब्यात घेउन त्यास खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४९०/२०२५ कलम ३०३ (२) या गुन्हयात अटक केली आहे.

अटक आरोपी नासेर सद्दन खान वय-५८ वर्षे, हा रेकॉर्डवरील आरोपी असुन त्याचेवर यापुर्वी ९२ हुन अधिक वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. सदर अटक आरोपी याचे यापुर्वी गॅरेज असल्याने त्याला वाहनांची संपुर्ण माहिती असुन तो वाहनांची चोरी करून त्यावरील इंजिन नंबर व चेसीस नंबर खोडुन सदर वाहनांची ओळख पुसुन ती वाहने विक्री करण्याचे काम करीत असे. आरोपीने चोरी केलेली १७ वाहने गुन्हयाचा तपासादरम्यान जप्त करण्यात आली आहेत. तसेच अटक आरोपीने पुरावा नष्ट करण्याचा उद्देशाने चोरीच्या वाहनावरील इंजिन व चेसीस नंबर खोडुन ते नष्ट केल्याने सदर गुन्हयात बी.एन.एस. कलम २३८,३४६ व मोटार वाहन अधिनियम कलम ५२,३९/१९२ या कलमाची वाढ करण्यात आली आहे. तसेच आरोपीने मोटार सायकलवरील इंजिन व चेसीस नंबर खोडण्यासाठी वापरलेले साहित्य देखील गुन्हयाचा तपासात हस्तगत करण्यात आले आहे.

आरोपीकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तांत्रिक तपासावरून अटक आरोपीकडुन नवी मुंबई परिसरामधील १७ चोरीची वाहने हस्तगत करून १४ गुन्हे उघडकीस आणले असुन उर्वरीत ३ बेवारस वाहनांचा मालकांचा शोध घेणे चालु आहे.

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे :-**

१) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४९०/२०२५ बी.एन.एस. कलम ३०३ (२)२३८,३४६. सह मोटार वाहन अधिनियम ५२,३९/१९२
२) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४०४/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२) .
३) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४७५/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
४) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४९६/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
५) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ०९/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
६) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४५७/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
७) एपीएमसी पोलीस ठाणे गु.र.नं ५७७/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
८) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४३२/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
९) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ८३/२०२४ बी.एन.एस कलम ३०३ (२).
१०) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं १०८/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).

११) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ३१८/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
१२) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४४८/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
१३) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं ४४०/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).
१४) खारघर पोलीस ठाणे गु.र.नं १२४/२०२५ बी.एन.एस कलम ३०३ (२).

**गुन्हयात हस्तगत मुद्देमाल :-**

०१) वेगवेगळया कंपनीच्या एकुण १७ मोटारसायकल, एकुण ९,८२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**अटक आरोपीत नाव व पत्ता :-**

**१) नासीर सद्दन खान वय-५८ वर्षे, सध्या राह. ८५/एन/एम एस/१९५/५, पार्ट २, सुभाष नगर, आनंद पार्क साईट, विक्रोळी वेस्ट, मुंबई ४०००७९, मुळ रा.नर्मदा सोसायटी, रूम नं ०२, सुलभ शौचालया जवळ, पार्क साईट, विक्रोळी मुंबई**

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा वपोनि/ श्री.सुनिल शिंदे, सपोनि/ सतिश भोसले, सहा.पो.उप निरी/ मंगेश वाट, सचिन शिंदे, पोहवा/महेश पाटील, पोना/सतिश चव्हाण, निलेश क्रिंदे, सोमनाथ काळे, नवनाथ पाटील, मपोशि/पुजा वैदय यांनी केली आहे.